अग्रलेखांचा बादशहा नवाकाल

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाल

# अण्णांकडून केजरीवालांची कानउघाडणी

दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत समाजसेवक अण्णा हजारे हे अरविंद केजरीवाल यांचा प्रचार करतील, असे अनेकांना वाटले होते. परंतु, स्वत: अण्णांनीच याबाबत खुलासा केला हे बरे झाले. दीड वर्षांपूर्वी ऑगस्ट महिन्यात दिल्लीत भ्रष्टाचारविरोधी समितीच्यावतीने आंदोलन केले गेले होते. त्यामध्ये अण्णा हजारेंनी तब्बल १३ दिवस उपोषण केले होते. त्या सगळ्या मोहिमेम ध्ये अरविंद केजरीवाल आणि प्रशांत भूषण यांनी मोठी भूमिका निभावलेली होती. हे आंदोलन यशस्वी करण्यामागे त्यांचा मोठा हातभार होता. ते अण्णांचे खंदे समर्थक होते. त्या आंदोलनानंतर केजरीवाल यांनी स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन करण्याचे ठरविले ज्याला अण्णा हजारेंचा विरोध होता. तरीदेखील केजरीवाल यांनी 'आम आदमी पार्टी' नावाचा पक्ष स्थापन केला आणि दिल्ली विधानसभा निवडणूक लढवण्याची घोषणा केली. त्याच वेळी अण्णांनी आपण कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार करणार नाही असे जाहीर केले होते. परंतु अण्णांबरोबरच्या आंदोलनामुळे प्रकाशात आलेल्या आणि देशभर प्रसिध्दी मिळालेल्या केजरीवाल यांनी त्याचा राजकीय गैरफायदा घेतला असेच म्हणावे लागेल. कारण देशात भ्रष्टाचाराविरुध्द एक राजकारण विरहित मोठे आंदोलन उभारावे आणि राजकीय लोकांचे कान पकडून त्यांच्या भ्रष्टाचारावर अंकुश आणावा तसेच लोकशाहीमध्ये चालणारी लाचखोरी लोकपाल विधेयकाच्या माध्यमातून रोखली जावी, असा अण्णा हजारे यांचा उद्देश होता. सगळ्यांनीच राजकीय पक्ष स्थापन केले आणि सगळेच राजकारणात उतरू लागले तर राजकारण्यांवर त्याचा कोणताच प्रभाव राहणार नाही. ज्यांनी समाजाला दिशा दाखवायची त्यांनी राजकारणाबाहेर राहून प्रबोधनाचेच काम केले पाहिजे. सुरुवातीला अण्णांना राजकारणात खेचण्याचे अनेक प्रयत्न झाले. त्यांनी नुसते उपोषण न करता निवडणुका लढवून दाखवाव्यात. त्यांना भ्रष्टाचार निपटून काढायचा असेल तर त्यांना राजकारणात यावेच लागेल, अशा प्रकारची टीकासुध्दा त्यांच्यावर झाली. केजरीवाल यांनीसुध्दा अण्णांना प्रत्यक्ष राजकारणात आणण्याचे अनेक प्रयत्न केले. सुदैवाने अण्णांनी याबाबत अतिशय योग्य निर्णय घेतला आणि राजकारणाच्या चिखलात न जाता निस्वार्थीपणे आपली भ्रष्टाचार विरोधी मोहीम चालू ठेवली.

## राजकारणाशिवाय समाजकारण

अण्णांच्या या निर्णयामुळे आज त्यांचा समाजातला आदर कायम आहे. त्याउलट परिस्थिती केजरीवाल यांची झाली. अण्णांबरोबर आंदोलन करताना त्यांच्याविषयी विशेषत: तरुणांमध्ये आदर होता. दिल्लीतले बरेच तरुण त्यांच्यासोबत होते. मात्र त्यांनी ज्यावेळी आम आदमी पार्टी स्थापन केली आणि प्रत्यक्ष निवडणूक लढविण्याचे ठरविले त्यावेळी हा तरुण वर्ग नाराज झाला. जे मोठे देशव्यापी आंदोलन उभे करायचे होते. स्वातंत्र्यानंतरचे व्यापक आंदोलन म्हणून अण्णा तसेच केजरीवाल यांच्याकडे आशेने पाहिले जात होते परंतु केजरीवाल हे आपला राजकीय स्वार्थ लपवू शकले नाहीत आणि त्यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने पडू लागली. त्यांना अशी अपेक्षा होती की, अण्णांच्या नावाचा आणि आंदोलनाचा आपल्याला फायदा मिळेल. काँग्रेस आणि भाजपा यांच्यापेक्षाही आपल्या जास्त जागा निवडून येतील. परंतु अण्णांनी या निवडणुकीपासून पूर्ण दूर राहण्याचे ठरविले. केजरीवाल यांच्याविरुध्द कोणताही आरोप किंवा टीका न करता प्रत्यक्ष निवडणुकीच्या राजकारणाला त्यांनी विरोध दर्शविला. काही ठिकाणी केजरीवाल यांच्या पार्टीने अण्णांचे पोस्टर वापरून आपला प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्याला अण्णांनी विरोध दर्शविला. आपल्या आंदोलनाच्यावेळी गोळा झालेल्या पैशांचा गैरवापर होऊ नये, अशीदेखील त्यांनी इच्छा व्यक्त केली. अण्णांच्या स्पष्ट भूमिकेमुळे केजरीवाल निश्चित हादरले आहेत. आपण अण्णांच्या नावाचादेखील वापर करत नसल्याचा खुलासा त्यांना करावा लागला.

## राजकारणाचा नुसता चिखल

दिल्लीत आम आदमी पार्टीचा प्रभाव पाहिजे तितका निर्माण झाला नाही. स्वत:च्या एकट्याच्या जिवावर आपण यशस्वी होऊ, असा अनाठायी आत्मविश्वास केजरीवाल यांना वाटत होता. परंतु अण्णांच्या भूमिकेमुळे तो आत्मविश्वास धुळीला मिळाल्यासारखे झाले आहे. या निवडणुकीतून केजरीवाल यांच्या हाती नेमके काय लागेल हे कुणीही सांगू शकत नाही. मात्र त्यांच्या या फाजील राजकीय आत्मविश्वासामुळे त्यांनी स्वत:चे नुकसान करुन घेतले. अतिशय मोठया राष्ट्रीय भावनेने किंवा प्रखर देशभक्तीचा अंगार फुलवणारे आंदोलन अण्णांमुळे केजरीवाल यांना छेडता आले असते. देशातल्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरू शकेल अशा प्रकारचा निस्वार्थी समाजकारणाचा आदर्श केजरीवाल यांना घालून देता आला असता. परंतु, त्यांना या पवित्र समाजकारणापेक्षा राजकारणाचा उकिरडा जास्त महत्त्वाचा वाटला. एक फार मोठी संधी त्यांनी घालवली हे त्यांचेच दुर्दैव म्हणावे लागेल. राजकारणच महत्त्वाचे असते आणि राजकारणांमुळे परिवर्तन घडते. असे असते तर अण्णांनी सुध्दा राजकारणाचा आश्रय घेतला असता. आतापर्यंत अनेक राजकीय पक्ष स्थापन झाले प्रत्येकाने परिवर्तनाच्या. भ्रष्टाचार निर्मूलनाच्या वल्गना केल्या. प्रत्यक्षात तसे काही घडले नाही. उलट आधी सामाजिक संघटना असलेले आणि नंतर राजकीय पक्ष झालेल्यांनी स्वत:च भ्रष्टाचार करायला सुरुवात केली. सध्याचे राजकारणाचे स्वरुप अतिशय गलिच्छ आहे. त्यात सुधारणा करायची असेल तर राजकारणाबाहेर राहून त्यांचा पाठपुरावा करावा लागेल. निवडणुकीत सुधारणा घडवाव्या लागतील तरच ते शक्य आहे. सत्तेची चटक लागल्यानंतर कोणीही सामाजिक सुधारणेचा आग्रह धरत नाही. भाजपासारखा पक्षदेखील आज काँग्रेसच्या बरोबरीने भ्रष्टाचार करीत असतो. अशा परिस्थितीत केजरीवाल यांची आम आदमी पार्टी या धटिंगणांच्या गर्दीत किती टिकून राहील याबद्दल आम्हाला शंका आहे. कदाचित निवडणुकीनंतर केजरीवाल यांनी पुन्हा आत्मपरिक्षण करावे आणि राजकारणविरहित समाजकारणाचा आग्रह धरावा.